लवाद नियमित दरखास्त क्र. ५८३ / २०१८
वरदायीनी फायनान्स
वि.
दत्तात्रय शेळके वगैरे

**आदेश निशाणी क्र. १७ आणि निशाणी क्र. १ वर**

ऋणको क्र. क्र.१ ते ४ यांना महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे मुदतीत म्हणणे देता आले नाही. तरी त्यांचे म्हणणे शिवाय दरखास्त पुढे चालवण्याचा झालेला आदेश रदद करण्यात यावा व त्यांनी दिलेले म्हणणे रेकॉर्डवर घेण्यात यावे यासाठी प्रस्तुत अर्ज दिलेला आहे.

२. त्यावर धनको यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. अर्जातील कथने खरे नाहीत. दरखास्तीचे काम लांबवण्यासाठी ऋणको यांनी म्हणणे वेळेत दिले नाही. त्यांचे कथनाचे पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा ऋणको यांनी दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

३. ऋणको क्र. १ ते ४ यांनी या अर्जासोबत त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यामुळे आता जर ऋणको क्र.१ ते ४ यांचे म्हणणेशिवाय प्रकरण पुढे चालवण्याचा झालेला आदेश रदद करुन त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर घेतले तर प्रकरणाचा गुणदोषावर योग्य व अंतिम न्यायनिर्णय होण्यास मदत होईल. त्याकरीता, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत दरखास्त ऋणको क्र. १ ते ४ यांचे म्हणणे शिवाय पुढे चालविण्याचा झालेला आदेश रदद करण्यात येत आहे. त्यांनी दिलेले म्हणणे रेकॉर्डवर घेण्यात येत आहे.

Sd/-

दिनांक : ११/०२/२०२०

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : B.R.Kondekar |
| b | Court | : C.J.S.D., Pandharpur. |
| c | Date of Order | : 11.02.2020 |
| d | Order signed by P.O. on | : 11.02.2020 |
| e | Order uploaded on | : 11.02.2020 |